गोदातीर दि. 16.12.25

# जिल्ह्यातील मोबाईल मिसिंगमधील ३० लाख ५० हजारांचे २०२ अँड्राइड मोबाईल हस्तगत

**■ मूळ मोबाईलधारकांना पोलीस अधीक्षकांच्या हस्ते मोबाईल दिले परत ■ सायबर शाखेची कारवाई**



**नांदेड (प्रतिनिधी)** – जिल्ह्यातील सार्वजनिक ठिकाणाहून व बाजारातून महागडे मोबाईल गहाळ झालेले साडेतीस लाख रुपयांचे २०० किंमती मोबाईल सायबर सेल व स्थागुशाच्या वतीने जप्त करण्यात आले. जप्त केलेले मूळ मोबाईलधारकांना पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या हस्ते सोमवार, दि. १५ डिसेंबर रोजी परत देण्यात आले.

जिल्ह्यातील सर्व पो. स्टे. यांचे पथक तयार करून मिसिंग मोबाईलचा शोध घेण्याची मोहीम राबविण्यात आली होती. सदर मोहिमेत नांदेड जिल्ह्यातील गहाळ झालेल्या मोबाईलचा शोध वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन एकूण २०२ मोबाईल ज्याची किंमत ३० लाख ४९ हजार रुपये हस्तगत करण्यात आले. शोध झालेल्या मोबाईलचे IMEI क्रमांकांची माहिती नांदेड पोलीस दलाचे Nanded Police या Facebook Page वर टाकण्यात आली आहे. सदरची कामगिरी सायबर पो.उप. नि. एम. बी. चव्हाण, पोलीस अमलदार राजेंद्र सिटीकर, दीपक ओढणे, महेश बडगु, मपोको कांचन कसबे, रेश्मा पठाण, शुभांगी जाधव, दावीद पिडगे, काशीनाथ कारखेडे, व्यंकटेश सांगळे, ज्ञानेश्वर यन्नावार, पहपक राठोड, साई शेंडगे यांनी पाडली आहे.